# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांक:07.06.2025 वार:शनिवार

---

1. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वेमार्ग आणि जगातील सर्वात उंचीवरच्या चिनाब रेल्वे पुलाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण
2. रिझर्व्ह बँकेकडून सलग तिसऱ्यांदा व्याजदरात कपात; रेपो दर साडेपाच टक्के
3. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गडचिरोलीत 12 जहाल नक्षल्यांची शस्त्रांसह शरणागती
4. दुर्गराज रायगडासह संपूर्ण राज्यात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा आणि
5. ज्येष्ठ विचारवंत दाजी पणशीकर यांचं ठाण्यात अल्पशा आजाराने निधन

**मोदी काश्मीर**

जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरू असलेले विकास प्रकल्प राज्याच्या विकासाला नवीन गती देतील असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. जम्मू आणि कश्मीरमध्ये 46 हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध पायाभूत प्रकल्पांचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते झाला; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे प्रकल्पाचं राष्ट्रार्पणही पंतप्रधानांनी केलं; तसंच या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या, जगातल्या सर्वात उंचीवरच्या चिनाब रेल्वे पुलाचं उद्घाटनही त्यांनी केलं. देशातला सर्वात उंचावरचा केबलवरचा पूल असलेल्या अंजी पुलाचं उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते झालं. चिनाब आणि अंजी हे पूल जम्मू-काश्मीरसाठी समृद्धीचं प्रवेशद्वार होतील असं पंतप्रधान यावेळी म्हणाले....

**आज जम्मू-कश्मीर का नौजवान नए सपने भी देख रहा है और उन्हें पूरे भी कर रहा है। अब कश्मीर का नौजवान बाज़ारों को, शॉपिंग मॉल्स को, सिनेमा हॉल को गुलज़ार देखकर के खुश है। यहां के लोग जम्मू कश्मीर को फिर से फिल्मों की शूटिंग का प्रमुख केंद्र बनते देखना चाहते हैं, इस क्षेत्र को स्पोर्ट्स का हब बनते देखना चाहते हैं। विकास का जो वातावरण जम्मू-कश्मीर में बना था, वो पहलगाम के हमले से डिगने वाला नहीं है। जम्मू-कश्मीर के आप सभी लोगों को, और आप सबसे नरेंद्र मोदी का वायदा है, मैं यहां विकास को रुकने नहीं दूंगा, यहां के नौजवानों को सपने पूरा करने से कोई भी बाधा अगर रूकावट बनती है, तो उस बाधा को पहले मोदी का सामना करना पड़ेगा।**

तत्पूर्वी, पंतप्रधानांनी कटरा इथं श्री माता वैष्णोदेवी-श्रीनगर वंदे भारत गाडीला हिरवा झेंडा दाखवला. तसंच शालेय विद्यार्थ्यांबरोबर प्रवास केला.

**अकरावर्ष**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळे भारतामध्ये गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन घडून आलं आहे. आकाशवाणीच्या बातम्यांमधून आम्ही; गेल्या 11 वर्षात केंद्र सरकारनं काही प्रमुख क्षेत्रांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीवर प्रकाश टाकत आहोत, या मालिकेतील आजचा विषय आहे; स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जा क्षेत्रात भारतानं केलेली प्रगती; ऐकुया एक वृत्तांत.....

**गेल्या दशकात, भारताने स्वच्छ ऊर्जेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे; हवामान बदलाच्या आव्हानांना समोरं जाण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यातही भारत जगातला आघाडीचा देश ठरतो आहे. सौर ऊर्जा, आणि पवन उर्जेसह अन्य शाश्वत ऊर्जा स्रोतांच्या माध्यमातून 2024-25 या आर्थिक वर्षात देशाची अक्षय ऊर्जा क्षमता 220 पूर्णांक 10 गीगावॅट झाली**

**आहे; ही क्षमता गेल्या वर्षीपेक्षा 29 पूर्णांक 52 गीगावॅटनं जास्त आहे. राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन, जैवऊर्जा कार्यक्रम आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वाढता वापर यासारख्या उपक्रमातून कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत आहेत.**

**या शिवाय, हवामान बदलाच्या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्यामध्ये भारताने सक्रिय भूमिका बजावली आहे. आंतरराष्ट्रीय सौर आघाडी आणि आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांसाठीच्या संघटनेचा भारत हा संस्थापक सदस्य आणि प्रमुख घटक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, "आपली वसुंधरा एक आहे, परंतु आपले प्रयत्न अनेक असले पाहिजेत." गेल्या दशकातील भारताच्या प्रवासावरून हेच स्पष्ट होतं की शाश्वत विकास हे केवळ एक उद्दिष्ट नाही तर ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी प्रशांत जाधव पुणे.**

**<u>पतधोरण</u>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं काल द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर केला. यामध्ये रेपो दरात अर्धा टक्के कपात करण्यात आली असून आता रेपो दर साडेपाच टक्के झाला आहे. फेब्रुवारीपासून सलग तिसऱ्यांदा रिझर्व्ह बँकेनं व्याजदरात कपात केली असून या कालावधीत रेपो दर एकंदर 1 टक्क्यानं कमी झाला आहे. चालू आर्थिक वर्षात चलनफुगवट्याचा दर 3 पूर्णांक 7 दशांश टक्क्यापर्यंत आटोक्यात राहील असा सुधारित अंदाज पतधोरण समितीनं आढाव्यात व्यक्त केला आहे. या आधी हा दर 4 टक्के राहील असा अंदाज होता. चालू आर्थिक वर्षासाठी देशाचा आर्थिक वृद्धी दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. सोन्याचे दागिने गहाण ठेवून अडीच लाख रुपयांपर्यंत कर्ज घेणाऱ्यांना आता 75 ऐवजी 85 टक्के इतक्या रकमेचं कर्ज मिळेल, असं गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलं. देशात परकीय चलनाचा पुरेसा साठा असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. व्याजदर कपातीच्या निर्णयाचं उद्योजकांच्या संघटनांनी स्वागत केलं आहे.

**<u>ईद</u>**

मुस्लीम धर्मीयांचा ईद उल अजहा अर्थात बकरी ईदचा सण आज साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने राज्यातील ठिकठीकाणच्या ईदगाह मैदानासह विविध मशिदींमध्ये सामुहिक नमाज अदा करण्यात येणार आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी ईद निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण सर्वांच्या जीवनात सुख, शांती, सौहार्द आणि समृद्धी घेऊन येवो असं राज्यपालांनी राधाकृष्णन यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>समर्पण-गडचिरोली</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील अतिदुर्गम कवंडे गावाला भेट दिली. फडणवीस यांच्या उपस्थितीत गडचिरोली पोलिस मुख्यालयात 12 जहाल नक्षल्यांनी शरणागती पत्करली. शरण आलेल्या 13 नक्षली जोडप्यांचा यावेळी सामूहिक विवाह लावून देण्यात आला. फडणवीस यांनी भेटवस्तू आणि संविधानाची प्रत देऊन त्यांचा सत्कार केला. सुरक्षा दलं आणि राज्य पोलिसांनी केलेल्या कामगिरीमुळे नक्षलवादाविरुद्धची लढाई अंतिम टप्प्यात असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले...

**एक कोटी रुपयांपेक्षा जास्त इनाम असलेले यांचं आत्मसमर्पण हेच इंगित करत आहे, की माओवादाची कंबर तुटली आहे त्यांनी आता पुन्हा भारताच्या संविधानावर पूर्ण विश्वास दाखवत मुख्य धारेमध्ये येण्याचा निर्णय घेतलेला आहे. यातनं एक संदेश उरलेले जे माओवादी आहेत त्यांना जातोय की तुम्हीही आत्मसमर्पण करा नाही केलं तर त्यांना आवश्यकतेप्रमाणे अटक केली जाईल किंवा त्यांनी हल्ला केला तर प्रतिहल्ल्यात त्यांना न्यूट्रलाइज केलं जाईल समर्पित जे माओवादी आहेत. अशाच तेरा जोडप्यांचं आज लग्न या ठिकाणी झालेलं आहे. हत्यार घेऊन संघर्ष करणारे वैवाहिक जीवनामध्ये अडकून आपलं नवीन जीवन सुरू करत आहेत. सर्वार्थाने आपण पुनर्वसन करतो आहोत हे यातनं इंगित होत आहे आणि म्हणून जी काही जोडपी आहेत यांना खूप शुभेच्छा देतो.**

**<u>शिवराज्याभिषेक</u>**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा किल्ले रायगडावर काल मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. छत्रपती संभाजी राजे आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराजांना शासकीय मानवंदना देण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराने किल्ले रायगड दुमदुमुन गेला. पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या शिवभक्तांनी लोककला आणि पोवाडे यांचं सादरीकरण केले. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त पुण्यातही लाल महालात विविध

कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल पुण्यात जिल्हा परिषदेत 'शिवस्वराज्य' गुढीचे पूजन करण्यात आले.

कोल्हापूरात नवीन राजवाड्यात शिवराज्याभिषेक सोहळा दिमाखात साजरा करण्यात आला. शिवशाहिरांचे पोवाडे, युध्दकला, सैन्य दलांच्या बॅण्ड पथकांनी यावेळी सलामी दिली. परभणी इथं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्र ग्रंथाचे वितरण करण्यात आलं. नंदुरबार, वाशिम, धुळे या ठिकाणीदेखील विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं होतं.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाच्यावतीने शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत राज्यभरातील 1097 आयटीआय अर्थात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'पंचपरिवर्तन' संकल्पनेवर आधारित व्याख्यानमालेची सुरुवात झाली. या उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष व्हिडिओ संदेशाद्वारे करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, इतिहासाची जाणीव आणि जबाबदार नागरिकत्वाचे मूल्य रुजवणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

**पालखी**

श्रीक्षेत्र शेगाव इथून निघालेली संत गजानन महाराजांची पालखी काल अकोला शहरात दाखल झाली. या ठिकाणी पालखीचं भव्य स्वागत करण्यात आलं.

**निधन**

ज्येष्ठ विचारवंत दाजी पणशीकर यांचं काल संध्याकाळी ठाण्यातल्या राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झालं. ते 92 वर्षांचे होते. रामायण महाभारताचे व्यासंगी असलेल्या दाजी पणशीकर यांनी 50 वर्षांहून अधिक काळ, व्याख्यानं आणि लेखनातून समाजाचं प्रबोधन केलं. त्यांनी एका दैनिकात सलग 16 वर्षे लेखमाला लिहिल्या होत्या. महाभारत-एक सुडाचा प्रवास, कर्ण खरा कोण होता? कथामृतम्, कणिकनीती, शंकराचार्यांच्या स्तोत्रांवर आधारित स्तोत्र गंगा, अपरिचित रामायण तसंच गानसरस्वती किशोरी आमोणकर आदिशक्तीचा धन्योद्गार अशी मौलिक ग्रंथसंपदा दाजी पणशीकरांनी आपल्या लेखणीतून साकारली. भारतीय संस्कृती आणि संत वाङ्मयाचे वैभव आपल्या लेखनातून, व्याख्यांनातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणाऱ्या व्यासंगी परंपरेचा मोठा दुवा निखळला, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. आजन्म ग्रंथोपासक, सडेतोड समीक्षक अशा व्रतस्थ विचारवंताचे निधन ही मोठी हानी असल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे. त्यांच्या निधनानं महाराष्ट्राचा गेल्या 50 वर्षांचा सांस्कृतिक इतिहास ज्ञात असलेलं व्यक्तिमत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी ठाण्यातील जवाहर बाग स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत.

**हवामान अंदाज**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाची शक्यता असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.